www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक युवक आधार मराठी

दैं. युवक आधार करीता प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापुर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले | श्री. सुरेश आत्माराम भोईर

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : 209 वा सोमवार दि. 14 एप्रिल २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514

## हनुमान जयंती निमित्त महासांगवी येथे रक्तदान शिबिर संपन्न

दैनिक युवक आधार

पाटोदा (प्रतिनिधी)- पाटोदा तालुक्यातील महासांगवी या गावामध्ये हनुमान जयंती निमित्त भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरास ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून अनेक तरुणांनी रक्तदान करून समाजाप्रती आपली सामाजिक बांधिलकी जपली. हे शिबिर हनुमान जयंती उत्सव समितीच्या वतीने जिल्हा रुग्णालयात बीड येथील रक्तपेढीच्या सहकार्याने आयोजित करण्यात आले होते. शिबिराचे उद्घाटन गावातील ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी गावातील विविध सामाजिक संस्था, कार्यकर्ते आणि युवक मंडळांचे सहकार्य लाभले. या शिबिरात एकूण १०१ युवकांनी रक्तदान केले. रक्तदात्यांना प्रमाणपत्र गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन श्री अन्नपूर्णा देवी बहुउद्देशीय सेवाभावी संस्था संचलित यांची मोलाची भूमिका राहिली. गावातील सर्व स्तरातील नागरिकांनी सहभाग नोंदवत हनुमान जयंतीचे औचित्य सामाजिक कार्यात रूपांतरित केल्या बद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.



# डॉ. बाबासाहेब आंबेडकर : महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह आणि 'अस्पृश्यतेच्या' नव्या प्रथा - दृष्टिकोन

महाड :- चवदार तळ्याचा ऐतिहासिक सत्याग्रह 20 मार्च 1927 या दिवशी झाला होता. त्यानंतर अनेक वर्षं हा दिवस 'समता दिन' तसंच 'सामाजिक सबलीकरण दिन' म्हणून साजरा केला जातो. आतापर्यंत समतेसाठी अनेक आंदोलनं झाली, भारतीय राज्यघटनेने या देशातल्या सर्व जाती-धर्मांना समान हक्क प्रदान केला. पण पाण्याच्या प्रश्नावरुन जातीय आणि धार्मिक अस्मिता कशा उफाळून येतात याची उदाहरणं आपण आजही समाजात पाहतो आहोत. तथाकथित सवर्ण, उच्चधर्मीय, उच्चजातीय लोकांकडून केला जाणारा दुजाभाव, द्वेष, अत्याचार अजूनही समाजात पाझरताना दिसतो. चवदार तळ्याचा सत्याग्रह होत असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लोकांना उद्देशून म्हटलं होतं, "चवदार तळ्याचे पाणी प्यायल्याने तुम्ही आम्ही अमर होऊ अशातला भाग नाही. आजपावेतो चवदार तळ्याचे पाणी प्यायलो नव्हतो तरी तुम्ही आम्ही काही मेलो नव्हतो. चवदार तळ्यावर जावयाचे ते केवळ तळ्याचे पाणी पिण्याकरिता नाही. इतरांप्रमाणे आम्हीही माणसे आहोत हे सिद्ध करण्याकरिताच त्या तळ्यावर आपल्याला जावयाचे आहे." भारतातील जातीव्यवस्थेने शोषण केलेल्या तसंच त्यावेळी सवर्णांकडून 'अस्पृश्य' मानल्या जाणाऱ्या दलित जातींना सरकारी आणि सार्वजनिक मालमत्तेवर समान हक्क देणारा कायदा 1923 साली मुंबई कायदे मंडळाने संमत केला. त्याची अंमलबजावणी करण्यासाठी महाड नगरपालिकेच्या पुढाकाराने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची सभा आयोजित करण्यात आली.



अशी आहे बाबासाहेबांची साताऱ्यातील शाळा सार्वजनिक ठिकाणं, पाणवठे आणि चवदार तळं अस्पृश्यांसाठी खुलं करण्यात यावं यासाठी झालेल्या सत्याग्रहात सवर्ण समाजातील नेते मंडळीही सहभागी झाली होती. या ऐतिहासिक सत्याग्रहात तीन हजारांहून अधिक लोक सहभागी झाल्याची सरकार दफ्तरी नोंद आहे. 'आम्हीही माणसे आहोत' हे जगाला ठणकावून सांगण्यासाठीचा लढा मात्र अजूनही संपलेला नाही. त्यामुळे या महाडच्या सत्याग्रहाचं मोल आजही अधोरेखीत होतंय.

































# बुध्दीमत्ता,कौशल्य व ज्ञाणाचा अथांग महासागर; भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर

भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे स्वप्न साकार करण्यासाठी सर्वांनीच प्रयत्न करायला पाहिजेत. स्वतंत्र भारताचे पहिले कायदामंत्री, भारतीय संविधानाचे शिल्पकार, भारतीय न्यायशास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ, राजनीतीज्ञ,तत्वज्ञ, समाजसुधारक, पत्रकार, वकील अशा महामानव भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकरांचा जन्म १४ एप्रिल १८९१ रोजी महु इथे झाला व संपूर्ण भारतवर्षे सुर्यासारखे लखलखायला लागले. जनुकाय बाबासाहेबांच्या रूपात या पृथ्वीतलावर दैवी शक्तीच प्रगट होवून ज्ञान जोत प्रगटली की काय असे सर्वांनाच वाटत होते. बाबासाहेबांनी समाजाच्या हितासाठी आणि देशहीतासाठी आपले प्राणपनाला लावले. त्यामुळेच त्याच्या अथक प्रयत्नाने संविधानाच्या चौकटीत संपूर्ण भारताला बांधून ठेवले व लोकशाही निर्माण केली.आज प्रत्येकाला संविधानाच्या माध्यमातून न्याय मिळत असतो.आजही अनेक देशांमध्ये हुकूमशाही दीसुन येते.परंतु बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या संविधानामुळेच भारतीय लोकशाही टीकुन आहे. बाबासाहेब आंबेडकर यांनी तळागाळातील लोकांना न्याय मिळावा यासाठी अहोरात्र प्रयत्न केले.तेव्हाच भारतात न्यायव्यवस्था प्रस्थापीत झाली.कारण बाबासाहेबांना कल्पणा होती की काही मुठभर समाज देशातील सर्वसामान्यांना कलंकीत करण्याचे काम करीत आहे.परंतु बाबासाहेबांचे या संपूर्ण हालचालींवर लक्ष होते. याकरीता समाजात जातीयवाद, धर्मवाद,पंथवाद यात कटुता निर्माण होवू नये याकरिता सर्वांना एकत्र आणन्याचे काम त्यांनी केले.आज जगामध्ये अनेक देशात बाबासाहेबांच्या विचारांची जोपासना केली जाते.कारण बाबासाहेबांच्या विचारांमध्ये ज्ञाणाचा व बुध्दीमत्तेचा अथांग महासागर आहे.त्याची आपण कल्पना सुध्दा करु शकत नाही.त्याची तुलना समुद्रापेक्षाही अफाट आहे.कारण त्यांच्या बुद्धीमत्तेचा व कौशल्याचा संपूर्ण जगात आजही गुणगान होतांना आपण पहातो.बाबासाहेब आंबेडकर ज्ञानयोगी असल्यामुळे त्यांची कला जगात कोणीही अवगत करू शकले नाही.आज भारतात संपूर्ण समाज आनंदाने रहातो व बागडतो ते फक्त बाबासाहेबांच्या विचारांमुळे व संविधानामुळेच. बाबासाहेबाचा जन्म गरीब घराण्यात झाला असला तरी ते मनाने व विचाराने खूप श्रीमंत होते.आज प्रत्येकाने भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांने प्रेरीत होऊन देश घडवीण्याकरीता पुढाकार घेण्याची गरज आहे.कारण बाबासाहेबांच्या विचाराने भारतालाच नाही तर संपूर्ण जगाला मोठी प्रेरणा दिली आहे.त्यामुळे आज जगातील प्रत्येक देशात भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा आदर केल्या जातो.परंतु आजचा राजकीय पुढारी बाबासाहेबांचे विचार विसरुन समाजाच्या प्रगतीकडे लक्ष न देता स्वतःची प्रगती करतांना दिसत आहे.याचे दुःख बाबासाहेबांना अवश्य होत असावे. बाबासाहेब आंबेडकर,ज्योतीबा फुले इत्यादी अनेक थोर महापुरुषांनी व विचारवंत देश सुजलाम सुफलाम व्हावा यासाठी अथक प्रयत्न केले व १९४७ ला भारत स्वतंत्र झाला.परंतु गेल्या काही वर्षांत मुठभर राजकीय पुढाऱ्यांनी भ्रष्टाचार करून वाममार्गाने मोठ्या प्रमाणात करोडोंची चल-अचल संपत्ती कमवुन देशाच्या १४० कोटी जनतेच्या खांद्यावर महागाई, बेरोजगारी, शेतकऱ्यांच्या समस्या,महागडे शिक्षणाचे ओझे लादले आहे.याचे दुःख बाबासाहेबांना अवश्य होत असेल.स्वतःला लोकप्रतिनिधी,जनप्रतिनिधी व स्वयंघोषित समाजसेवक समजणाऱ्या राजकीय पुढाऱ्यांनो आपण वाममार्गाने कमविलेली करोडोंची चल-अचल संपत्ती सरकारच्या तिजोरीत जमा करावी किंवा जनकल्याणासाठी उपयोगात आणावी.असे जर कार्य राजकीय पुढारी करीत असेल बाबासाहेबांना राजकीय पुढाऱ्यांची खरी आदरांजली होईल.कारण बाबासाहेबांनी समाज हितासाठी आपले संपूर्ण आयुष्य पणाला लावले याला कुठेही तडा जाणार नाही याची जाण आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी ठेवायला पाहिजे. बाबासाहेब आंबेडकर आपले सर्वांचेच दैवत आहे.त्यामुळे जयंतीच्या निमित्ताने देशातील प्रत्येक व्यक्तीने, प्रशासनाने व सरकारने वृक्षारोपणाचा संकल्प केला पाहिजे.कारण दिवसेंदिवस निसर्गाचा ह्यास होत आहे.त्यामुळे निसर्गाला वाचविण्याची जबाबदारी आपल्यावर आहे.त्यामुळे १४ एप्रिलला वृक्षारोपण व्हायला हवे यामुळे एकाच दिवशी देशात लाखोंच्या संख्येने वृक्षलागवड होईल आणि संपूर्ण निसर्ग प्रफुल्लित होईल व प्रत्येक झाडात, पानात व फुलात आपल्याला बाबासाहेबांचे दर्शन अवश्य होईल.भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त कोटी कोटी प्रणाम !जय हिंद !

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**(स्वतंत्र पत्रकार )**
**नागपूर.**

# प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघ आणि जिल्हा परिषद, लातूरच्या संयुक्त विद्यमाने आरोग्य शिबिराचे आयोजन


दैनिक युवक आधार

लातूर वार्ताहर : प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघ, महाराष्ट्र राज्य आणि जिल्हा परिषद, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त जिल्हा परिषद स्थायी सभागृह, लातूर येथे दिनांक १५ एप्रिल, २०२५ रोजी सकाळी ११ ते २ या वेळेत आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास जिल्हाधिकारी मा वर्षा ठाकूर घुगे, पोलीस अधीक्षक मा सोमय मुंडे, मुख्य कार्यकारी अधिकारी मा राहुल कुमार मीना, प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष मा डी. टी. आंबेगावे उपस्थित राहणार आहेत. दरम्यान जिल्हापरिषद लातूर येथील कर्मचारी तसेच जिल्ह्यातील सर्व पत्रकार व पत्रकारांचे कुटुंब आणि शासकीय कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून या शिबिराचा लाभ घ्यावा असे प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघ, महाराष्ट्र राज्य या संघटनेचे मराठवाड़ा अध्यक्ष विष्णु आष्टीकर, लातूर जिल्हाध्यक्ष लहुकुमार शिंदे, जिल्हा महिला अध्यक्षा वैशालीताई पाटील, जिल्हा उपाध्यक्ष खंडेराव देडे, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख संतोष सोनवणे, जिल्हा सचिव दिनेश गिरी यांनी आवाहन केले आहे. प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघ लातूर जिल्हा शाखेच्या वतीने विविध प्रकारचे सामाजिक, शैक्षणिक, आरोग्यविषयक, पत्रकार व त्यांच्या कुटुंबातील सदस्यांच्या कल्याणार्थ विविध उपक्रम राबविले जातात त्याचाच एक भाग म्हणून पत्रकार, त्यांचे कुटुंब, लातूर शहर व परिसरातील गरजू कुटुंबासाठी मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराचा आपण लाभ घ्यावा असे संघटनेच्या वतीने आवाहन करण्यात आले आहे.










## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे जागतिक विद्याभुषित जगविख्यात अर्थतज्ञ होते .त्यांनी भारतातील शेतकऱ्याच्या शेतीच्या संभाव्य धोरण प्रश्नाविषयी मुलभूत अभ्यास केला होता.भारतातील शेतकऱ्याचा पुढील भविष्य काळातील शेतीचा नेमका प्रश्न काय आणि त्यावर भविष्यात काय उपाय योजना केल्या पाहिजेत, यां विषयी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेली मांडणी दिपस्तंभा सारखी अनमोल अगणित मार्गदर्शक ठरली आहे.विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकराची ओळख अपुर्ण आहे. त्याचे कार्य हे संपुर्ण भारतातील दलितांसाठी नव्हे तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक अष्टपैलु व्यक्तिमत्व होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे जागतिक अर्थशास्त्रज्ञ , न्यायशास्त्रज्ञ, तत्वज्ञ, जलतज्ञ, कृषितज्ञ, उद्योग तज्ञ, पत्रकार, दुरदृष्टीतज्ञ, राजकारणी, समाजकारणी, तर भारतीय संविधानाचे जनक व शिल्पकार देखील होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जगविख्यात अर्थतज्ञ होते. त्यानी भारतातील भविष्यातील शेतीच्या प्रश्नाविषयी मुलभूत दुरदृष्टी अभ्यास केलेला होता.भविष्यातील शेतकऱ्यांसाठी शेतीचा नेमका प्रश्न काय आणि त्यावर काय उपाय योजना केल्या पाहिजेत, यां विषयी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलीली मांडणी आजही दिपस्तंभा सारखी मार्गदर्शक ठरली आहे. सन 1944 वर्षा मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतातील शेतकऱ्यांच्या शेतीसाठी लागणारा खर्च केंद्र सरकारने उचलला पाहिजे, त्या साठीची रक्कम शेतकऱ्यांना दिली पाहिजे, अशी सूचना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केली होती. यांच सुचनेचे पालन करत प्रथम संपुर्ण भारत देशामध्ये,75ते 80 वर्षा नंतर तेलगना राज्य सरकार हे डॉ. बाबासाहेब आंबेडकराचा विचार स्वीकारणारे पहिले राज्य ठरले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकराचा हाच विचार देखील केंद्र सरकारने स्वीकारून भारतातील शेतकऱ्यांना तुटपुंजी का होईना, मदत देण्यात सुरुवात केली आहे. यां मिळणाऱ्या मदतीसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे अनमोल अगणित असे योगदान आहे.शेतीच्या राष्ट्रीयकरणा बाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार - - - - डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारतातील शेतकऱ्याच्या पुढील भविष्यातील शेतीच्या राष्ट्रीय करणाच्या बाबत त्यांनी आपले विचार मांडले होते. भारत देशातील 80 टक्के लोक शेतीवर उदर निर्वाह करत असेल तर राष्ट्रीय उत्पनातील शेतीचा वाटा लक्षात घेऊन यां क्षेत्राचे राष्ट्रीय करण करावे आणि भारतातील शेतकऱ्यांना भांडवल पुरवावे, अशी संकल्पना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडली होती. शेतीसाठी लागणारी यंत्रसामुग्री, कसदार बियाणे,उत्तम खते, इतर साहित्य देण्याची जबाबदारी केंद्र सरकारची व राज्य सरकारची असल्याचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या संकल्पनेत नमुद केले होते. शेतीसाठी लागणारी अवजारे आधुनिक पाहिजेत. पारतीने केलीली शेती कधीच फायदेशीर ठरणार नाही, आधुनिकीकरणासाठी जमिनीचे छोटे छोटे तुकडे नाहीतर एकत्रिकरण होणे आवश्यक आहे. शेतीला दर्जेदार बियाण्याची गरज आहे. ही त्रिसूत्री शेतीची उत्पाकता वाढविणासाठी आवश्यक असल्याचे त्या वेळेस डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितले होते. अल्पभूधारक आणि अत्यल्पभूधारकयाचे वाढते प्रमाण चिंताजंक आहे. छोटया क्षेत्रावर शेतीत आधुनिकीकरण करून उत्पदान वाढविणे शक्य होणार नाही. यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे ठाम मत होते. जमिनीच्या विखंडनाची मुख्य कारणे म्हणजे वारस हक्क आणि हस्तातर हे आहेत.दारिद्र, दुष्काळ, व्यसनधिनता, अज्ञान, कलह ही जमिनीच्या विखंडणाची महत्वाची कारणे आहेत, असे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मत होते. जमीनदारीं संपवन्यासाठी प्रयत्न - - पुर्वीच्या काळी गावोगावी खोती पद्धत होती. खोत हे जमीनदार व वतनदार असायचे. शेतकऱ्यां कडुम शेतसारा जमा करून तो सरकार दरबारीं जमा करण्याचे काम खोत करायचे. मात्र शेतकऱ्याच्या अज्ञानाचा, अशिक्षितपणचा फायदा घेऊन ते शेतकऱ्याची लुट करायचे.जमिनीचा अकरा महिने भाडेपट्टा लिहुन घ्यायचा , एका एकर मागे खंडिभर भात मत्ता म्हणुन घ्यायचा.तो जर नाही दिलतार पुढच्या वर्षी दिडपट सारा वसुल करायचा.एखाद्या कुळातील वसुली न झाल्यास त्या कुळाच्या शेतात असणाऱ्या आंबा, फणंस, नारळाच्या झाडावर खोताचा हक्क असायचा, हे सर्व प्रकार कोकण भागात मोठ्या प्रमाणात सुरु होते. त्यांच्याविरुद्ध सहा वर्षे शेतकरी आंदोलन सुरु होते.शेतकऱ्याच्या आंदोलनाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पाठिंबा तसेच सहभाग होता.1934 साली महाराष्ट्रात पुणे येथे भरवलेल्या शेतकरी परिषदेचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे होते. यांच परिषदेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मजुर पक्षाची घोषणा केली.या परिषदेत शेतकरी समस्यावर चर्चा करण्यात आली.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शेतकरी आणि सामान्य जनतेच्या हक्कासाठी आवाज उठवीला. नारायण नागू पाटील हे त्या खोती पद्धती विरोधातील आंदोलनाचे नेतृत्व करत होते.27,ऑक्टोबर 1933 साला पासुन सुरु झालेला हा संप तब्बल सहा वर्ष सुरु होता. या काळात शेतकऱ्यांचे प्रचंड हाल झाले त्यांना अनेक समस्याना सामोरे जावे लागले. महाराष्ट्र राज्यातील शेतकऱ्याचे आंदोलन इतिहासातील हे पहिले आंदोलन होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 14 आमदाराच्या पाठिंब्यावर 17 सप्टेंबर, 1939 साली खोती पद्धत बंदचे विधेयक विधिमंडळात मांडले.त्या नंतर केंद्र सरकारला जाग आली.साधारण पणे 1950 पासुन खोती निर्मूलन अधिनियम लागु केला. कुलाबा अर्थात रायगड जिल्ह्यातील एक लाख 22 हजार 860 एकर जमीन डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी खोताच्या तावडीतुन मुक्त केली.कित्येक दशकाची जुलमी पद्धत संपुष्टात आली.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सिंचनासाठी अजोड काम - - 1942 ते 1946 या कालावधीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे श्रम, सिंचन,विद्युत शक्ती समितीचे अध्यक्ष झाले होते.केंद्रीय पाटबंधारे व अर्जमंत्री म्हणुन ही त्यांनी काम पहिले होते.भारतात सयुक्त प्रकल्प, बहुउद्धेशीय प्रकल्प या संकल्पना प्रथम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडल्या. केंद्रीय कॅबिनेट मंत्री असताना चार वर्षाच्या काळात त्यांनी झारखंड आणि पश्चिम राज्यातील दामोदर नदी प्रकल्प, ओडिसा राज्यातील महानदी नदीवरील हिराकुंड प्रकल्प, मध्यप्रदेश राज्यातील अमरकंटक बांणधरण या वरील सोन नदी प्रकल्प समवेत देशातील 15 मोठया धरणाची ब्लु फिल्म काढुन कामाला सुरुवात केली होती. या सर्व प्रकल्पाचा उद्देश एकच होता की, पुर नियंत्रण, जलसिंचन, विद्युत निर्मिती, पाणी पुरवठा हा होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या केंद्राला नदीजोड प्रकल्पा बाबत सुचना - - डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नंदीजोड प्रकल्पा बाबत केंद्र सरकारला सुचना दिल्या होत्या.त्या वेळेस केंद्र सरकारने हा सल्ला प्रत्यक्षात अंमलात आणला असता तर आज भेडसावणाऱ्या अनेक समस्या सुटल्या असत्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे पाणी प्रकल्पातील योगदान आणि त्यांची असणारी दूरदृष्टी वाखण्याजोगी आहे.1945 मध्ये, ओडिसा राज्यातील महानदी वरील हिराकुंड धरणाची पायाभरणी तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी केली होती. पंडित नेहरू धरणाना आधुनिक भारताची मंदिरे म्हणत होते.या मंदिराच्या पायाभरणीचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांच्या कारकिर्दीत केले होते. जमिनीचे विखंडण तसेच जगातील इतर देशातील शेतीवर अवलंबून राहणारी लोकसंख्या याचे प्रमाण खुप भिन्न आहे. इंग्लंड, अमेरिया या देशात मोचकी जनता शेतीवर अवलंबून आहे.भारत देशात हे प्रमाण खुपच जास्त असल्याने जास्तीची लोकसंख्या औद्योगिक कारणासाठी वापरावी लागणार आहे. भारताला औद्योगिकरण तसेच उपजीविकेसाठी दुसरे साधन सरकारने उपलब्ध करून देण्याची आवश्यकता असल्याचे मत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी व्यक्त केले होते. शेतीची उत्पादकता वाढावी म्हणुन, शेत जमिनीचे सपाटीकरण, बांधबंदिस्ती, सिंचनाची सोय,भांडवली गुंतवणूक केली तरच शेती ही लाभाची ठरेल असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मत होते. जलसिंचनाच्यासुविधा निर्माण झाल्याशिवाय शेती फायदयात राहणार नाही.शेतीत आधुनिक यंत्रे आणली पाहिजेत .शेती ही समुदयाने करून त्यात समुदायिक शेती पद्धती विकसित झाली पाहिजे. असे भविष्यातील उच्य महान दीपस्तंभा सारखे उदात्त विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे होते. बाबासाहेब आंबेडकराचे हे विचार केंद्र सरकारने अंमलात आणुन आमुलाग्र बदल घडवुन त्यांनी दाखविलेल्या मार्गांवर चालणे हिच खरी त्यांच्या जयंतीच्या शुभदिनी केंद्र सरकार कडुन शुभेच्छाची स्नेहफुले त्यांच्या चरणी शोभुन दिसतील.

संकलन /लेखक :- प्रा. संजय मोरे (अण्णा) अँटी करप्शन फाउंडेशन ऑफ इंडिया महा. राज्य अध्यक्ष / मानव अधिकार आंतरराष्ट्रीय फेडरेशन महा. राज्य अध्यक्ष / सर्व शक्ती सेना महा. राज्य अध्यक्ष या पदावर कार्यरत असुन सामाजिक व साहित्यिक क्षेत्रात त्यांचे मोलाचे योगदान आहे.



मु पो. सिंगनुर ता. रावेर,जिल्हा, जळगांव. ( महाराष्ट्र ) पिन कोडं 425006 आपला विश्वासू - प्रा. संजय मोरे.

**दैनिक युवक आधार** (RNI NO :- MAHMAR/2023/89514) **हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.**

**daily YUVAK ADHAR (RNI NO :- MAHMAR/2023/89514) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle**

# पिंपळा येथील चार हिऱ्यांची गगणं भरारी! आदिवासी समाजाचा गावासमोर नवा आदर्श...

दैनिक युवक आधार
वाशीम जिल्हा/ प्रतिनिधी करण धोंगडे

पिंपळा तालुका मालेगाव जिल्हा वाशिम येथील चार हिऱ्यांनी गगन भरारी घेतली असून त्यांच्यावर शुभेच्छाचा वर्षाव होत आहे,आणि ही चार हिरे आदिवासी समाजातील असून त्यांनी पिंपळा गावासमोर नाहीतर तालुक्यासमोर मोठा आदर्श निर्माण केला आहे, एक काळ असा होता की या समाजाला शिक्षणात अजिबात रस नव्हता,सुशिक्षित नव्हता, बेरोजगार मोठ्या प्रमाणात होता, आदिवासी समाजाला मोठ्या प्रमाणात आरक्षण असून सुद्धा त्यांना आरक्षणाची व्याख्या कळत नव्हती,आपला उदरनिर्वाह करण्यासाठी बाहेरगावी गावी जात असत, आताही जातात पण उन्हाळ्यात आणि कमी प्रमाणात, मालेगाव तालुक्यातील पिंपळा गावांमध्ये आदिवासी समाज मोठ्या प्रमाणात आहे, 2006 च्या अगोदर या समाजाला शिक्षणाचे एवढे महत्त्व कळत नव्हते फक्त काम आणि काम कालांतराने थोडा बदल होऊन 06/06/2006 मध्ये संतोषजी झाटे या नावाच्या व्यक्तीने शासकीय नोकरीमध्ये पहिला पाऊल ठेवला आणि आपल्या समाजाची नवीन ओळख गावासमोर निर्माण केली.त्यांनी आपल्या हालाकीच्या परिस्थितीवर मात करून कोणत्याही संकटाला न डगमगता शिक्षण आणि शिक्षणाच घेत राहिले आणि त्यांना फळ मिळालं, त्यानंतर त्यांचा आदर्श घेत युवा पिढीचं युवा तरुण व्यक्ती महत्त्व म्हणजे संदीपजी ढंगारे यांनी 30/0 4/ 2012 मध्ये ग्रामसेवक या पदावर विराजमान झाले, समाजातील इतर मुलांनीं यांचा आदर्श घेत लगेचच 30/05/2023मध्ये दबंग व्यक्ती महत्त्व म्हणजे महादेवजी ढंगारे यांनी महाराष्ट्र पोलीस मध्ये आपली पकड मजबूत ठेवून यश खेचून आणले, आणि महाराष्ट्र पोलीस झाले हे चक्र इथंच थांबलेलं नाही तर 01/04/2025 रोजी शांत स्वभावाचं व्यक्तिमत्व उमेश ढंगारे हे बँक ऑफ इंडिया मध्ये प्रोबेशनरी ऑफिसर (po),या पदावर विराजमान झाले, या हिऱ्यांनी समाजापुढे एक नवा आदर्श निर्माण केला आहे,आणि समाजाचंच नव्हे तर गाव,तालुका जिल्हा पातळीवर त्यांनी आपल्या नावाची कमालीची पकड बांधली आहे.यांचा आदर्श जर बाकीच्या मुलांनी घेतला तर पिंपळा हे गाव वाशिम जिल्ह्याच्या नकाशावर एक नंबर राहील यात काही शंका नाही. यावेळी मित्र,राजकीय सामाजिक,गावकरी मंडळीकडून या हिऱ्यांवरती शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. या समाजाची उल्लेखनीय बाब म्हणजे या समाजात बहुतांश लोक हे मांसाहारी आहे,पण ही गोष्ट पिंपळा येथील आदिवासी समाजाला लागू होत नाही कारण येथील समाज जवळपास 70 ते 80 टक्के शाकाहारी आहे.

पिंपळा या गावाची ग्रामपंचायत सुद्धा आदिवासी समाजाच्या ताब्यात आहे,याचं कारण असं आहे की या समाजात श्री. जगदेवरावजी ढंगारे नावाची जादूची कांडी आहे,(माजी सरपंच तथा पंचायत समिती सदस्य) सुद्धा आहेत, त्यांनी 2021 मध्ये आपल्या जादूची कांडी फिरवून श्री.संतोषजी ढंगारे यांना पिंपळा ग्रामपंचायतची सत्ता ताब्यात दिली आहे,आणि सरपंच संतोषजी ढंगारे ते आपल्या परीने गावाचा विकास करीत आहेत.

# म्हसळा तालुक्यातील स्वराध्या फाउंडेशनच्या वतीने शाळेला भेटवस्तु प्रधान

दैनिक युवक आधार
जिल्हा प्रतिनिधी प्रमुख
/एम.डी.भोईर

म्हसला तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद मराठी शाळा मेंदडी येथे शुक्रवार दि.११/०४/२०२५ रोजी स्वराध्या फाउंडेशन यांच्या वतीने कै.जानू भूनेसर आणि कै. पंढरीनाथ भांगरे यांच्या पुण्य स्मरणार्थ दोन संगणक संच आणि एक स्पीकर सेट भेट देण्यात आले, सदर कार्यक्रमास सर्व पालक आणि ग्रामस्थ मोठ्या प्रमाणात उपस्थित होते, प्रमुख पाहुणे यांनी खूप मोलाचे मार्गदर्शन केले तसेच जिल्हा परिषद शाळा मेंदडी मराठी शाळेचे मुख्याध्यापक किशोर मोहिते,तुळशीराम पाटील सर यांनी आलेल्या पाहुण्याचे स्वागत करून शब्द सुमनाने आभार मानले.स्वराध्या फाउंडेशनचे अध्यक्ष सचिन भूनेसर यांनी आपले मनोगत व्यक्त केले तसेच सर्व मुलांना संगणका बाबत प्रशिक्षण दिले , आणि सचिव ॲड. शुभांगी भूनेसर यांनी आजच्या काळात संगणका किती महत्वाचा घटक आहे या बाबत माहिती दिली , संगणकाच ज्ञान असणे आताच्या काळाची गरज आहे आणि संगणकामुळे आपल्या मुलांचं विकास होण्यास मदत होईल तसेच पुढेही भविष्यात स्वराध्या फाउंडेशन तर्फे शैक्षणिक उपक्रम आणि मेडिकल चेकअप या सारखे विविध उपक्रम घेण्यात येतील अस सांगण्यात आले.प्रमुख पाहुणे श्रीमती चंद्रभागा भूनेसर ,श्रीमती कमल भांगरे, मोरेश्वर पाटील ,तसेच स्वराध्या फाउंडेशनचे अध्यक्ष सचिन भूनेसर,सचिव ॲड.शुभांगी भूनेसर,सदस्य अभिषेक भांगरे व इतर उपस्थित होते.




# राज्यमंत्री मेघना दीदी साकोरे बोर्डीकर यांच्या वाढदिवसानिमित्त सुरेश भाऊ भुमरे यांनी केली गरजुना मदत..

दैनिक युवक आधार
वाशीम जिल्हा/प्रतिनिधी
करण धोंगडे

महाराष्ट्र राज्याच्या राज्यमंत्री तथा परभणी जिल्ह्याच्या लाडक्या पालकमंत्री आदरणीय मेघना दीदी साकोरे बोर्डीकर यांनी त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या चाहत्यांना आव्हान केले होते की माझ्या वाढदिवसानिमित्त कोणत्याही प्रकारचे पुष्पगुच्छ,फुलं, गिफ्ट न आणता त्या बदल्यात माझ्या वाढदिवसानिमित्त वह्या,पेन पुस्तके,ज्या गरजू व्यक्तींना कामा पडतील अशा भेटवस्तू मला द्याव्यात किंवा ज्या ठिकाणी गरजू व्यक्ती आहेत त्या ठिकाणी जाऊन स्वतः मदत करावी,मेघना दीदी ह्या नेहमीच चांगला कामामुळे प्रचलित असतात, त्यांनी केलेला संकल्प हा सर्वापेक्षा वेगळा असतो आणि संकल्प प्रत्येक्षात सुद्धा राबवतात,म्हणूनच परभणी जिल्ह्यात सध्या एकच वाक्य ऐकायला मिळतं ते म्हणजे विकासाचं दुसरं नाव म्हणजे मेघना दीदी साकोरे बोर्डीकर,त्याचाच एक भाग म्हणून परभणी जिल्ह्यातील नावाजलेले युवा व्यक्ती महत्त्व म्हणजे भाजपा युवा मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष सुरेश भाऊ भुमरे यांनी आदरणीय मेघना दीदींच्या वाढदिवसानिमित्त हिंगोली जिल्ह्यातील गुंज येते ट्रॅक्टर विहिरीत कोसळून मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांच्या कुटुंबीयांना मदतीचा हात दिला आहे,सुरेश भाऊ भुमरे हे सामाजिक कार्यात सदा अग्रेसर असतात,परभणी जिल्ह्याच्या लाडक्या पालकमंत्री आदरणीय मेघना दिदी साकोरे बोर्डीकर यांचे ते अत्यंत निकटवर्तीय मानले जातात,यावेळी सुरेश भाऊ भुमरे यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन आदरणीय मेघना दीदी साकोरे बोर्डीकर यांनी त्यांच्या कार्याचे कौतुक करून आभार व्यक्त केले.























शुभेच्छुक :- माहिती अधिकार व पत्रकार संरक्षण समिती व दैनिक युवक आधार पदअधिकारी.












# निफाड येथे क्रीडा सह्याद्री फाउंडेशन तर्फे हनुमान जन्मोत्सव मोठ्या उत्साहात संपन्न

दैनिक युवक आधार
उत्तर महाराष्ट्र विभागीय
संपादक : विनोद गायकवाड

निफाड : क्रीडा सह्याद्री फाउंडेशन निफाड यानी सालाबादप्रमाणे यावेळीही हनुमान जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला असून फाउंडेशनचे सर्वच नागरिकांशी स्नेह संबंध असल्यामुळे सर्व जुने सभासद आणि हितचिंतक आणि नव्या पिढीचे खेळाडू, सभासद असे सर्वच मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी विधिवत पूजन करून आणि आरती गाऊन कार्यक्रम साजरा करण्यात आला. यावेळी मैदान पूजन व क्रीडा साहित्याचे पूजन करण्यात आले त्यानंतर सर्वांना हमुमानाचा प्रसाद आणि दूध वाटप करण्यात आले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष विलास गायकवाड,सदस्य विनोद गायकवाड,रमेश वडघुले ,दत्तू रायते ,चेतन कुंदे ,श्याम चौधरी, प्रतीक्षा कोटकर ,कीर्ती कोटकर ,विजय घोटेकर विविध खेळांचे प्रशिक्षक, आणि खेळाडू यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. क्रीडा सह्याद्री फाउंडेशन नाशिकच्या माध्यमातून खेळाडूंना जास्तीत जास्त सुविधा देण्याचा आमचा नेहमीच प्रयत्न राहिलेला आहे असे यावेळी अध्यक्ष विलास गायकवाड यांनी सांगितले.













